## जिल्हाधिकारी कार्यालय ( निवडणूक शाखा ) जळगांव
## हमाल पुरवठा करणेबाबत प्रथम फेर ई निविदा सुचना

लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019, पुर्वतयारी , प्रत्यक्ष निवडणूक कामकाज -- ईव्हीएम प्रथमस्तर तपासणी, रँडमाईझेशन, मतदान यंत्रे सिलींग, मतमोजणी, मतदान यंत्रे किंवा मतदान साहित्य वाहनात लोडींग / अनलोंडीग, तसेच इतर निवडणूक विषयक कामाकरिता आवश्यकतेनुसार हमाल ( unskilled labour ) पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव, प्रथम फेर ई निविदा मागवित आहेत.

**1. हमाल पुरवठा करणे संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| कामाचा तपशिल | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम रु | संख्या, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 ;चे अनुषंगाने- ईव्हीएम प्रथमस्तर तपासणी, मतदान यंत्रे सिलींग, मतमोजणी, मतदान यंत्रांचे पेटया किंवा मतदान साहित्य वाहनात लोडींग / अनलोंडीग, रँडमाईझेशन तसेच इतर निवडणूक विषयक कामाकरिता आवश्यकतेनुसार हमाल पुरवठा करणे. | रु. 4,50,000/- (रु. चार लाख पन्नास हजार) | रु. 6,000/- | जिल्हा निवडणूक अधिकारी/ उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे निर्देशाप्रमाणे दिलेल्या ठिकाणी ( जिल्हा स्तर आणि तालुका स्तर ) मागणी नुसार हमाल पुरवठा निविदाधारकास करावा लागेल. |

**2. हमाल पुरवठा करणे निविदेचे संक्षिप्त वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | प्रथम फेर ई निविदा प्रसिध्दी | दि. 07/03/2019 |
| 2 | प्रथम फेर ई निविदा फॉर्म जिल्हा निवडणूक शाखेकडून उपलब्ध | दि. 07/03/2019 पासुन ते दि. 13/03/2019 ( सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 या कालावधीत ) |
| 3 | प्रथम फेर ई निविदा फॉर्म स्विकृती सुरु दिनांक व वेळ | दि. 07/03/2019 सकाळी 11.00 वाजेपासुन |
| 4 | प्रथम फेर ई निविदा फॉर्म स्विकृती अंतिम तारीख व वेळ | दि. 13/03/2019 संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत. |
| 5 | प्रथम फेर ई निविदा उघडणे दिनांक वेळ व ठिकाण (तांत्रिक व दराचा लिफाफा) | दि. 15/03/2019 , सकाळी 11.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक शाखा, जळगांव |

3. निविदा धारकाने जिल्हाधिकारी कार्यालयात निविदा फॉर्म फी रु. 1200/- जमा करावी. त्यानंतर निविदा फॉर्म आणि तपशील देणेत येईल. निविदा फॉर्म फी रक्कम नापरतावा राहील.
4. निविदा धारकाने निविदेची बयाणा रक्कम रु. 6000/- मात्र ( उप जिल्हा निवडणूक अधिकारी , जळगांव यांचे नावे देय असलेला चेक / डी.डी. स्वरूपात ) निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफ्यात जमा करावी.
5. निविदा सादर करतांना दोन लिफाफ्यात सादर करावी. तांत्रिक लिफाफ्यात निविदा धारकाची आवश्यक माहिती , बयाणा रक्कम धनादेश इ.द्यावे आणि द्वितीय लिफाफ्यात हमाली दर ( एक हमालासाठी एक दिवसाकरीता ( 8 तासाचे कालावधी ) दर नमुद करावा - दर सर्व करांसहीत असावा / नमुद करावेत. दोन्ही लिफाफे ( तांत्रिक लिफाफा आणि व्यापारी दराचा लिफाफा असे लिहून ) एका मोठ्या लिफाफ्यात सादर करावेत. या लिफाफ्यावर निविदा सादर करणा-या संस्थेचे नाव व पत्ता पुरण लिहावे.
6. निविदा उघडण्याचे वेळी निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी निविदा धारकाच्या संमतीसह उपस्थित राहू शकतात.
7. सदर निविदेचा कालावधी हा लोकसभा व विधानसभा निवडणूक-2019 चे कामकाज पूर्ण होईपावेतो असेल.
8. निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदा नमुन्यांची तपशिलासह निविदा प्राप्त करतांना जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेत निविदेसोबत मिळेल. तसेच सदर माहीती www.jalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
9. इच्छुक निविदाधारकांनी निविदेतील अटी व शर्तींबाबत [illegible]

स्वसाक्षांकीत करुन सादर करावीत.

10. निविदेबाबतचे अंतिम अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

11. निविदेसंबंधी उपरोक्त नमुद तारखांमध्ये ईबदल झाल्यास त्याची सूचना उपरोक्त नमूद संकेतस्थळांवर तसेच जिल्हाधिकारी, जळगांव यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. व्यक्तिगत सूचना देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

क्र.निवड-1/कावि/ 75/2019
दिनांक - 07/03/2019

COLLECTOR & DISTRICT ELECTION OFFICER JALGAON

( डॉ. अविनाश ढाकणे )
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव**

निविदा सूचना

## लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 हमाल पुरवठा करणेबाबत.

1. लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019, करिता ईव्हीएम प्रथमस्तर तपासणी, रँडमाईझेशन, मतदान यंत्रे सिलींग, मतमोजणी, मतदान यंत्रे किंवा मतदान साहित्य वाहनात लोडींग / अनलोंडीग, तसेच इतर निवडणूक विषयक कामाकरिता आवश्यकतेनुसार हमाल पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव, प्रथम फेर ई निविदा मागवित आहे.

**हमाल पुरवठा करणे संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| कामाचा तपशिल | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम रु | संख्या, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019, करिता ईव्हीएम प्रथमस्तर तपासणी, मतदान यंत्रे सिलींग, मतमोजणी, मतदान यंत्रे किंवा मतदान साहित्य वाहनात लोडींग / अनलोंडीग, तसेच इतर निवडणूक विषयक कामाकरिता आवश्यकतेनुसार हमाल पुरवठा करणे. | रु. 4,50,000/- (रु. चार लाख पन्नास हजार) | रु. 6,000/- | जिल्हा निवडणूक अधिकारी / उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे निर्देशाप्रमाणे दिलेल्या ठिकाणी ( जिल्हा स्तर आणि तालुका स्तर ) दिलेल्या वेळेत मागणी नुसार पुरवठा निविदाधारकास करावा लागेल.. |

2. **निविदा मिळण्याचे ठिकाण** - निविदेचा तपशील www.jalgaon.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा आणि विस्तृत तपशील जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेत रू. 1200/- मात्र भरून मिळू शकेल.

3. **निविदा फॉर्म भरण्याची पध्दत व फी** – निविदा धारकाने निविदेची बयाणा रक्कम रु. 6000/- ( उप जिल्हा निवडणूक अधिकारी , जळगांव यांचे नावे देय असलेला चेक / डी.डी. स्वरूपात ) निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफ्यात जमा करावी.

4. प्रथम फेर ई निविदा ही दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी लागेल.

5. दोन लिफाफयापैकी लिफाफा क्र.1 हा तांत्रिक लिफाफा असेल व लिफाफा क्र.2 व्यापारी लिफाफा (दराचा) असेल.

6. तांत्रिक लिफाफा क्रमांक. 1 मध्ये मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे, निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता करणारा राहील व लिफाफा क्रमांक 2 हा दराचा लिफाफा राहील.

1 **अ) तांत्रिक लिफाफा क्र. 1-**

तांत्रिक निविदेच्या लिफाफयामध्ये पुढील नमुद केलेल्या बाबी सादर कराव्यात.

1 निविदाधारक संस्था प्रोप्रायटरशीप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लीक लिमिटेड, फर्म, सहकारी संस्था, इ. ज्या प्रकारची नोंदणी असेल त्याप्रमाणे सक्षम प्रधिका-याकडील नोंदणी प्रमाणपत्र (छायांकित प्रत)

2 मनुष्यबळ पुरवठा नोंदणी प्रमाणपत्र

3 निविदाधारकाचे संस्था/फर्म/कंपनी TIN क्रमांक आणि पॅनकार्ड ची छायांकित प्रत

4 सन 2017- 18 (Assessment year 2018-19) या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र

5 वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र

6 माहे मार्च 2018 अखेर वस्तू व सेवा कर भरलेबाबत चे प्रमाणपत्र किंवा चलनाची छायांकित प्रत

7 निविदाधारकास अटी व शर्तो मान्य असलेबाबतचे रु.100/- चे स्टँप पेपरवर नोटरी/कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र.

8 शासकीय/ निमशासकीय कामामध्ये निविदा धारकास काळया यादीत टाकण्यात आले नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र

9 निविदाधारक यांनी खालील मुद्दयावंर माहिती देणेत यावी.

i) हमाल पुरवठा केल्याबाबतचे पूर्वअनुभव प्रमाणपत्र

ii) हमाल उपलब्धते बाबतचा तपशिल ( संख्येसह )

2 **ब) लिफाफा क्र. 2-** व्यापारी किंवा दरासंबंधीचा लिफाफा

1) निविदेचे दर विहीत केलेल्या तक्यात नमूद करावे त्यावर संस्थेचा शिक्का आणि संस्थेचे प्रमुख / प्रोपायटर इ. यांची स्वाक्षरी असावी.

2. निविदेच्या फॉर्म नं. 2 मध्ये दिलेल्या प्रत्येक बाबींचे दर नमूद करावेत. दर अंकी व अक्षरी -- दोन्ही स्वरूपात नमूद करावेत

## लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 - हमाल पुरवठा करणेबाबत.- अटी व शर्ती

| | |
|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी कार्यालय ( निवडणूक शाखा ) जळगांव यांचेकडे रू. 1200 /- मात्र जमा करून निविदा फॉर्म आणि निविदेचा विस्तृत तपशील मिळू शकेल. निविदा सादर करणार यांनी विहीत निविदा फॉर्ममध्येच सादर कराव्यात. |
| 2 | अर्जदार हयांना सदर व्यवसायाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे अनिवार्य आहे. त्यापेक्षा जास्त अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. |
| 3 | निविदा दोन लिफाफे पध्दतीचे अवलंब करुन सादर करावयाचे आहे. (लिफाफा क्र. 1 तांत्रिक लिफाफा व लिफाफा क्र. 2 दराचा लिफाफा). |
| 4 | लिफाफा क्र.1 मधील सर्व बाबींची पूर्तता केली असेल तरच त्या निविदाधारकाचा लिफाफा क्र. 2 उघडण्यात येईल. |
| 5 | निविदेमध्ये प्रत्येक बाबींचा एकच दर व त्यांची माहिती सुस्पष्टपणे नमूद करावी. एकापेक्षा जास्त दर नमूद करु नयेत. तसेच निविदेमध्ये सादर केलेले बाब निहाय दर हे सर्व करांसहीत सादर केलेले असावेत. |
| 6 | निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबधिच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे निविदाधारकाचे प्राधिकार पत्र (Bidders Power of Attorney) देणे आवश्यक राहील. |
| 7 | निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी/शर्ती, नियम या व्यतिरीक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ट करु नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. |
| 8 | प्रथम फेर ई-निविदा संदर्भात निविदा प्रक्रिये दरम्यान किंवा निविदा स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांचा निर्णय अंतिम राहील. |
| 9 | निविदाधारकाने निविदा फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचन करुन तदनंतर निविदा फॉर्म भरावा अपूर्ण माहिती असलेला निविदा फॉर्म बाद करण्यात येईल. काही अपरिहार्य कारणास्तव खाडाखोड केली असल्यास त्याठिकाणी निविदाधारकाने पूर्ण स्वाक्षरी करावी. |
| 10 | निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव यांचेकडेस राखून ठेवणेत आलेले आहेत. |
| 11 | मंजूर निविदाधारकास निविदा मंजूर झाल्यानंतर सुरक्षा ठेव/अनामत म्हणून आठ दिवसांत जिल्हाधिकारी, जळगांव या नांवे राष्ट्रीयकृत बॅकेतील 1 वर्ष मुदत असलेली रु. 40,000/- ची बॅक गॅरंटी (जळगांव येथील देय असलेली) सादर करावी लागेल. तसेच मंजूर निविदाधारकास कामकाज सुरु करण्याअगोदर निविदेतील अटी शर्तींना बांधील असलेचा करारनामा स्टॅम्प पेपरवर करुन देणे बंधनकारक राहील. |
| 12 | मंजूर निविदाधारकामार्फत पुरविण्यात येणा-या हमाल यांचे वेतन किमान वेतनापेक्षा कमी वेतन दिले जाणार नाही याची जबाबदारी निविदा धारकाची राहील. |
| 13 | मंजूर निविदाधारकास कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून सदर कामाचा परवाना प्राधिकृत अधिकारी यांच्या कडून घेणे बंधनकारक राहील. |
| 14 | कामगार कायदयातील सर्व तरतुदींची पूर्तता करणे मंजूर निविदा धारकावर बंधनकारक राहील. |
| 15 | निविदा मंजूर न झाल्यास बयाणा रक्कम मंजूर निविदाधारकास कार्यारंभ आदेश पारीत झाल्यानंतर परत मिळेल. याकरिता विलंब शुल्क किंवा व्याजाची मागणी निविदाधारकास करता येणार नाही. |
| 16 | सदर निविदेचा कालावधी लोकसभा व विधानसभा निवडणूक 2019 चे कामकाज पूर्ण होईपर्यंत असेल. |
| 17 | निविदा धारकाच्या कोणत्याही अटी व शर्ती मान्य करण्यात येणार नाहीत. |
| 18 | मंजूर निविदाधारकामार्फत पुरविण्यात येणारे कामगार 18 वर्षावरील असणे आवश्यक आहे. |
| 19 | निविदाधारकांने कोणतेही प्रकारे उपनिविदाधारक नेमण्यात येवू नये. |
| 20 | निविदाधारक स्वतः, किंवा त्यांची संस्था अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबधित असता कामा नये. |
| 21 | मंजूर निविदा धारकाने जिल्हाधिकारी जळगांव / उप जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव यांनी निर्देशित केलेल्या मागणीप्रमाणे व ठिकाणी हमालांचा पुरवठा न केल्यास व सदर व्यवस्था इतर ठिकाणावरुन करावी लागल्यास मंजूर निविदेपेक्षा जास्तीचा जो खर्च होईल तो खर्च मंजूर निविदा धारक यांचेकडून वसूल करणेत येईल अन्यथा जिल्हाधिकारी जळगांव हे जमिन महसूलाची थकबाकी म्हणून सदर खर्च वसूल करतील व अनामत रक्कम व बँक गॅरंटी जप्त करणेत येईल. तसेच मंजूर निविदेप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणूक 2019 च्या कामकाजाच्या वेळी मागणी केल्यानुसार हमाल उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. विहीत वेळेत व मागणीनुसार हमाल उपलब्ध करुन न दिल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 मधील तरतुदीनुसार मंजूर निविदाधारक शिक्षेस पात्र राहील. |

| | |
|---|---|
| 22 | करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास मा.जिल्हाधिकारी, जळगांव ठरवतील ती रक्कम किंवा सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. |
| 23 | निविदाधारकांस कामांसाठी कोणतेहि प्रकारचे अग्रीम मिळणार नाही. निविदाधारकाने सादर केलेल्या देयकानुसार शहानिशा करुन जी रक्कम देय राहील ती अदा केली जाईल. |
| 24 | मंजूर निविदा धारकास सदरचे कामाकरिता अदा करणेत येणा-या देयकामध्ये लागू असणारे आयकर व त्या वरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. आयकर वगळता सर्व कर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| 25 | प्राप्त निविदा स्वीकारणे अथवा नामंजूर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा सर्व अधिकार जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे कडेस राखुन ठेवणेत आलेले आहेत. |
| 26 | सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करणेचा व राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा अधिकार जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे कडेस राखुन ठेवणेत आलेले आहेत. |
| 27 | निविदधारक/संस्था यांना शासकीय/ निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळया यादीत घोषीत केलेले असल्यास अशा निविदाधारक/संस्था यांनी निविदा भरु नयेत. असे आढळुन आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही. किंवा अशा निविदा धारकाची निविदा मंजूर झालेली असल्यास ती रद्द करण्यात येईल. |
| 28 | बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही. |
| 29 | कामाच्या अंदाजित रक्कमेत वाढ किंवा घट होऊ शकेल याबाबतचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांना राहतील. |
| 30 | या संदर्भात केंद्र व राज्य शासनांचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रक मध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी, शर्तो व नियम लागू राहतील. |
| 31 | निवडणूकीच्या कामकाजाच्या हमाल कामगारांना काही ईजा दुखापत होणार नाही याची दक्षता घ्यावी.कामकाजाच्या वेळी हमाल कामगारांना काही अपघात/ दुर्घटना किंवा कोणती इजा झाल्यास याबाबतची सर्व जबाबदारी मंजूर निविदा धारकाची असेल. |
| 32 | ठेकेदार यांचेकडून पुरविणेत येणारे हमाल हे वयस्कर किंवा व्यसनी नसावित . |
| 33 | हमालांना ओळखपत्र देणे बंधनकारक राहील. नियुक्त केलेल्या अधिका-यांच्या आदेशानुसार हमालांना काम करावे लागेल. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रे मा. भारत निवडणूक आयोगाची मालमत्ता आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रे हाताळतांना काळजीपुर्वक कामकाज करावयाचे आहे. यंत्रे सुचनेशिवाय गोदामाच्या बाहेर नेऊ नयेत. |
| 34 | ठेकेदाराने नेमून दिलेल्या तारखेस लेखी अथवा तोंडी कळविणेत आलेल्या संख्येनुसार, निर्देशित केलेल्या ठिकाणी हमालांचा पुरवठा करावा लागेल. हमाल कमी पडतात, हमाल मिळत नाहीत ही सबब चालणार नाही. तसेच ईव्हीएम यंत्र शासकीय गोदाम भुसावळ तहसिल कार्यालय आवार भुसावळ या ठिकाणी असून, निर्देशित ठिकाणी व विहीत वेळेत हमाल पुरविणेची तजवीज पुरवठादाराने करावयाची आहे यासाठी प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही. |
| 35 | हमालांचे कामाची वेळ मागणी प्रमाणे राहील. 8 तासांचा एक दिवस गणला जाईल, तसेच 4 तासापेक्षा कमी कालावधी असेल तर अर्धा दिवस गणला जाईल. |
| 36 | हमाल व्यक्तीनी ईव्हीएम मशिनच्या पेटया गोदामातून ट्रक मध्ये चढविणे तसेच ट्रक मधुन गोदामामध्ये उतरविणे या दोन्ही बाबी विना तोडफोड पार पाडावयाच्या आहेत. मोठी व लहान पेटी ही सुरक्षितपणे गोदामात ठेवणेची, गोदामांमध्ये पेटया उघडून तपासणीसाठी देणे व तपासणी झालेल्या पेटया भरुन जागेवर ठेवणे व त्याच प्रमाणे एका गोदामामधुन दुस-या गोदामामध्ये पेटया हलवणे इत्यादी कामे पर्यवेक्षकाच्या सुचनेनुसार करण्याची जबाबदारी हमाल व ठेकेदार यांची असेल. |
| 37 | हमाल ठेकेदाराने दर महीन्याच्या 5 तारखेस देयक अदा करणेकामी या कार्यालयास सादर करावे. सदर देयकाबरोबर केलेल्या कामाचे विवरण व कालावधी याबाबत संबंधित अधिका-याचे / कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| 38 | निविदेसंभातील कोणताही वाद हा जळगांव जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये चालविण्यात येईल. |

COLLECTOR & DISTRICT ELECTION OFFICER JALGAON

( डॉ. अविनाश ढाकणे )
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव

# निविदा सूचना

## लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019
## हमाल पुरवठा करणेबाबत.

| कामाचा तपशिल | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम रु | संख्या, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019, करिता ईव्हीएम प्रथमस्तर तपासणी, मतदान यंत्रे सिलींग, मतमोजणी, मतदान यंत्रे किंवा मतदान साहित्य वाहनात लोडींग / अनलोडींग, तसेच इतर निवडणूक विषयक कामाकरिता आवश्यकतेनुसार हमाल पुरवठा करणे. | रु. 4,50,000/- (रु. चार लाख पन्नास हजार) | रु. 6,000/- | जिल्हा निवडणूक अधिकारी / उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे निर्देशाप्रमाणे दिलेल्या ठिकाणी ( जिल्हा स्तर आणि तालुका स्तर ) दिलेल्या वेळेत मागणी नुसार पुरवठा निविदाधारकास करावा लागेल.. |

प्रथम फेर ई निविदा अर्ज आणि अटी / शर्ती तपशील जिल्हाधिकारी कार्यालय , निवडणूक शाखा येथे दि.07/03/2019 ते दि. 13/03/2019 या कालावधीत सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत रू. 1000 /- मात्र शुल्क भरून मिळतील. ई निविदा सीलबंद पाकीटात सादर करावयाची अंतिम मुदत दि. 13/03/2019 संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत आहे.

तसेच **www.jalgaon.gov.in** या संकेतस्थळावर सदर निविदेचे सविस्तर वेळापत्रक तसेच संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. सदर विहीत नमुन्यांमध्येच पुरवठादारांनी आपल्या निविदा सादर कराव्यात.

निविदेबाबतचे अंतिम अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

COLLECTOR & DISTRICT ELECTION OFFICER JALGAON

**( डॉ. अविनाश ढाकणे )**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव**

लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 करीता
जिल्हाधिकारी कार्यालय ( निवडणूक शाखा ) जळगांव यांना हमाल पुरवठा करणेबाबत.

निविदा फॉर्म क्रमांक-2 (व्यापारी लिफाफा )

**फर्म चे नांव** ------------------------------------------------------------

**पत्ता** ------------------------------------------------------------

| अ.नं. | तपशील | दर | संख्या | दर रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रति हमाल प्रति दिवस दर | 8 तासांकरिता | 1 | |
| 2 | प्रति हमाल प्रति दिवस पुरवठादार यांचे कमीशन | -- | -- | |
| 3. | एकूण | -- | 1 | |

ठिकाण-

( निविदा धारकाची सही )

दिनांक-

शिक्का

## निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र

(रु. 100 स्टॅम्प पेपर वर दयावयाचा मजकुर)

**प्रति,**

**मा.जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव.**

मी/आम्ही ------------------------------------------------ लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 करीता हमाल पुरवठा करणेसाठी पुरवठादाराची नेमणूक करण्याकरिता सोबत जोडलेल्या प्रमाणे तांत्रिक व व्यापारी लिफाफयामध्ये निविदा सादर करीत असून, सदर निविदा सूचना आणि अटी व शर्ती मी / आम्ही पूर्णपणे वाचलेल्या असून, सदर अटी व शर्तींच्या अधीन राहून मी/आम्ही सदर निविदा सादर करीत आहोत.

**प्रतिज्ञापत्र.**

मी याव्दारे प्रतिज्ञापत्र सादर करतो की, मी सादर केलेली निविदा मंजूर झाल्यास निविदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेन व या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ, साधन सामुग्री निर्देशित केलेल्या वेळेत व विहीत ठिकाणी उपलब्ध करुन देईन. मला याबाबत पूर्ण कल्पना आहे की, माझ्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसूर/दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव निश्चित करतील अशा दंडास अथवा कायदेशीर शिक्षेस मी पात्र राहीन. निविदेतील अटी व शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तींचे मी पूर्णपणे पालन करील.

निविदा ज्यांच्या कडून दाखल करण्यात आलेल्या त्या संस्थेचे नांव व पत्ता-

1. निविदाधारकांचे संपूर्ण नांव व पत्ता -

निविदाधारकांची स्वाक्षरी

साक्षीदार-

1.------------------------------------------ रा.---------------------------(स्वाक्षरी)

2.------------------------------------------ रा.--------------------------- (स्वाक्षरी)

# स्वघोषणापत्र

मी---------------------------------- रा.----------------------------------------वय------------ सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (निवडणूक शाखा) या कार्यालयाची लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2019 करीता हमाल पुरवठा करणेसाठी पुरवठादाराची नियुक्ती करणेकरीता निविदा सूचना सन 2018 करीता------------------------------------------------------------------------------------------------या फर्मने निविदा सादर केलेली असून, सदर निविदेकरीता मी जिल्हाधिकारी कार्यालयास सिलबंद पाकीटामध्ये निविदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे/माहिती खरी असून, मी अथवा माझे फर्मचे नांव कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने पुरवठादारांच्या काळया यादीत टाकलेले नाही. मी/माझे फर्मने उक्त -निविदेच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भा.दं.वि. कलम 199,200 अन्वये मी शिक्षेस पात्र राहील, तसेच मी सादर केलेली निविदा अवैध ठरेल.

ठिकाण------------------

दिनांक-----------------

साक्षीदाराची सही------------------

स्वघोषणापत्र करणाराची सही

नांव--------------------------------

पत्ता-----------------------------